‘आयपीएल’ २२ मार्चपासून?

इंडियन प्रीमियर लीगचे अध्यक्ष अरुण धुमल यांचे संकेत

पीटीआय, नवी दिल्ली

इंडियन प्रीमियर लीगचे (आयपीएल) आगामी सत्र २२ मार्चपासून सुरू करण्याचा विचार असून लोकसभा निवडणूक असतानाही ‘आयपीएल’चे आयोजन संपूर्ण देशात करण्यात येणार असल्याचे संकेत ‘आयपीएल’चे अध्यक्ष अरुण धुमल यांनी दिले. देशभरात लोकसभा निवडणुका एप्रिल व मेदरम्यान होण्याची शक्यता आहे आणि त्यामुळेच ‘आयपीएल’च्या १७व्या सत्राचा कार्यक्रम अजूनही जाहीर करण्यात आलेला नाही.

सुरुवातीला लीगच्या केवळ १५ दिवसांच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यात येणार आहे. उर्वरित सामन्यांचा कार्यक्रम निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर घोषित केला जाईल, असे धुमल म्हणाले. लोकसभा निवडणुकांच्या तारखांची घोषणा पुढील महिन्याच्या सुरुवातीला होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ‘‘स्पर्धेची सुरुवात २२ मार्चपासून करण्याचा आमचा विचार आहे. आम्ही सरकारी संस्थांसोबत मिळून याबाबत काम करीत आहोत. आम्ही प्रथम सुरुवातीचा कार्यक्रम जाहीर करू. संपूर्ण स्पर्धेचे आयोजन भारतातच केले जाणार आहे,’’ असे धुमल यांनी सांगितले.

यापूर्वी, २००९ मध्ये लोकसभा निवडणुकांमुळे ‘आयपीएल’चे संपूर्ण सत्राचे आयोजन दक्षिण आफ्रिकेत करण्यात आले होते. तर २०१४ मध्ये काही सामने संयुक्त अरब अमिराती (यूएई) येथे पार पडले होते. यानंतर २०१९ च्या निवडणुकांदरम्यान संपूर्ण लीगचे आयोजन भारतातच झाले होते. जूनमध्ये होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर ‘आयपीएल’चा अंतिम सामना २६ मेला आयोजित केला जाऊ शकतो.

भारतीय संघ ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत ५ जूनला न्यूयॉर्क येथे आयर्लंडविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करू शकतो. १ जूनला कॅनडा व अमेरिकेदरम्यान होणाऱ्या सामन्याने विश्वचषक स्पर्धेचा प्रारंभ होईल. नियमानुसार ‘आयपीएल’चा उद्घाटनीय सामना गेल्या हंगामातील विजेता व उपविजेता संघांदरम्यान होता. त्यामुळे गतविजेता चेन्नई सुपर किंग्स व उपविजेते गुजरात टायटन्स यांच्यात सलामीची लढत होऊ शकेल.

आगामी ‘आयपीएल’ हंगामासाठीचा लिलाव गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये पार पडला होता. ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कवर या लिलावात ‘आयपीएल’मधील सर्वाधिक बोली लावण्यात आली. त्याला कोलकाता नाईट रायडर्स संघाने २४.७५ कोटी रुपयांना खरेदी केले.

‘कर्ज-जीडीपी गुणोत्तरा’त ७३.४ टक्क्यांपर्यंत घसरण शक्य

नाणेनिधीच्या इशाऱ्याला धुडकावून लावणारा रिझर्व्ह बँकेच्या पत्रिकेत दावा

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात ‘आयएमएफ’च्या ताज्या इशाऱ्याला धुडकावून लावत, देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) तुलनेत देशावरील कर्जाचे प्रमाण हे उत्तरोत्तर घसरत जाणार असल्याचा दावा रिझर्व्ह बँकेच्या मंगळवारी प्रसिद्ध झालेल्या पत्रिकेतील लेखाने दावा केला आहे. नाणेनिधीने भारताचे कर्ज-जीडीपी गुणोत्तर हे मध्यम कालावधीत चिंताजनक अशा १०० टक्क्यांपेक्षा जास्त वाढू शकते, असा अलिकडेच दिलेल्या इशाऱ्याला अशा प्रकारे मध्यवर्ती बँकेने उत्तर दिले आहे.

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर मायकेल पात्रा हे सह-लेखक असलेला ‘द शेप ऑफ ग्रोथ कॉम्पॅटिबल फिस्कल कन्सोलिडेशन’ या शीर्षकाचा लेख मध्यवर्ती बँकेच्या मासिक पत्रिकेत प्रसिद्ध झाला आहे. त्यात भारताचे कर्ज-जीडीपी गुणोत्तर २०२३-२४ मधील अंदाजे ८१.६ टक्क्यांच्या पातळीवरून २०३०-३१ पर्यंत ७३.४ टक्क्यांपर्यंत घसरेल, असा दावा करण्यात आला आहे. ‘आमच्या अनुमानानुसार असे दिसून आले आहे की, सामान्य सरकारी कर्ज-जीडीपी गुणोत्तर हे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालात निर्धारित केलेल्या अंदाजित पातळीपेक्षा कमी राहणे शक्य आहे,’ असे या लेखात म्हटले आहे. मंगळवारी प्रसिद्ध झालेला हा लेख मध्यवर्ती बँकेच्या फेब्रुवारीच्या मासिक पत्रिकेचा भाग म्हणून प्रकाशित झाला आहे.

या संदर्भात, ‘मध्यम कालावधीत सरकारची उसनवारी ही देशाच्या जीडीपीपेक्षा वरचढ ठरेल आणि त्यामुळे आणखी कठोर वित्तीय शिस्तीचे अनुसरण करणे आवश्यक ठरेल, अशा तऱ्हेने ‘ऐतिहासिक धक्का वास्तवरूपात येईल’ असा नाणेनिधीने दिलेला इशारा आम्ही स्पष्टपणे नाकारतो,’ असे या लेखातून प्रत्युत्तर देण्यात आले आहे.

बँकांकडून ठेव दरात पुरेपूर वाढ

देशातील बँकांचे ठेवींचे दर गेल्या पाच वर्षांतील उच्चांकी पातळीवर पोहोचले असून, कर्जाची वाढती मागणी पाहता, घटलेल्या तरलता स्थितीला सावरण्यासाठी बँकांनी मुदत ठेवींवरील व्याजदरात वाढ करणे अपरिहार्य ठरले, असे प्रतिपादन रिझर्व्ह बँकेच्या ताज्या मासिक पत्रिकेत करण्यात आले आहे. बँकांनी मागील काही महिन्यांत मुदत ठेवींवरील व्याज दरात सातत्याने वाढ केली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपेक्षा खासगी बँकांची कर्ज वितरणातील वाढ जास्त आहे. देशातील बँकांनी मे २०२२ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत नवीन आणि जुन्या मुदत ठेवींवरील सरासरी व्याज दरात अनुक्रमे २.३३ टक्के आणि १.५७ टक्के वाढ केली आहे. एक वर्षावरील मुदत ठेवींचे दर ६ ऑक्टोबर २०२३ रोजी ६ ते ७.२५ टक्के होते. हे दर त्या आधी म्हणजे ७ ऑक्टोबर २०२२ रोजी ५.४५ ते ६.१० टक्के होते, असे अहवालात म्हटले आहे. कर्जाच्या चढ्या व्याजदराचा परिणाम मुदत ठेवींच्या दरावर होत आहे. मात्र, मागील काही महिन्यांत नवीन मुदत ठेवींवरील व्याजदरात घट होताना आता दिसत आहे., असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

माजी फुटबॉलपटू ब्रेमा यांचे निधन

बर्लिन : अर्जेंटिनाविरुद्ध १९९० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात एकमेव गोल करीत पश्चिम जर्मनीला जेतेपद मिळवून देणाऱ्या आंद्रियास ब्रेमा यांचे निधन झाले आहे. ते ६३ वर्षांचे होते. सुझॅन शेफर यांनी ब्रेमा यांच्या निधनाची माहिती दिली. ब्रेमा यांचे हृदयविकारच्या तीव्र धक्क्याने निधन झाल्याचे शेफर यांनी सांगितले. ‘‘ब्रेमा नेहमीच आमच्या मनात राहतील. एक विश्वचषक विजेत्या खेळाडूसोबतच विशेष व्यक्ती म्हणून ते नेहमीच आमच्या स्मरणात राहतील,’’ असे बायर्न म्युनिक क्लबने आपल्या निवेदनात म्हटले आहे.

ब्रेमा १९८० ते १९९०च्या दशकात जर्मनीच्या दिग्गज खेळाडूंमध्ये सहभागी होते. त्यांनी १९९०मध्ये संघाला विश्वचषक मिळवून देण्यात निर्णायक भूमिका पार पाडली. ब्रेमा यांनी इंग्लंडविरुद्ध झालेल्या उपांत्य सामन्यातही गोल झळकावला होता. पश्चिम जर्मनीने पेनल्टी शूटआऊटमध्ये हा सामना जिंकला होता. त्यांनी रोम येथे झालेल्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाविरुद्ध सामन्याच्या ८५व्या मिनिटाला पेनल्टीचे रूपांतर गोलमध्ये करताना संघाला जेतेपद मिळवून दिले होते. त्यांनी पश्चिम जर्मनी व नंतर जर्मनी संघाकडून ८६ आंतरराष्ट्रीय सामने खेळले.

क्लब स्तरावर ब्रेमा यांनी दोन वेळा जर्मन जेतेपद पटकावले. एकदा १९८७मध्ये बायर्न व दुसऱ्यांदा कॅसरस्लॉटर्नसोबत १९९८मध्ये जेतेपद मिळवले. यासोबत त्यांनी इटालियन लीग ‘सेरी ए’चे जेतेपद देखील आपल्या नावे केले. १९८९मध्ये इंटर संघाकडून खेळताना त्यांनी ही किमया साधली.

सातत्यपूर्ण कामगिरीचा भारताचा प्रयत्न!

प्रो लीग हॉकीच्या दुसऱ्या टप्प्यात नेदरलँड्सशी गाठ

राऊरकेला : जागतिक विजेत्या अग्रमानांकित नेदरलँड्सवर प्रो-लीग हॉकीच्या पहिल्या टप्प्यात मिळवलेल्या विजयानंतर तेच सातत्य दुसऱ्या टप्प्यातही राखण्यास भारतीय हॉकी खेळाडू उत्सुक आहेत. तर दुसरीकडे नेदरलँड्स आपल्या झालेल्या पराभवाची परतफेड करण्यासाठी मैदानात उतरेल. त्यामुळे हा सामना रंगतदार होईल अशी अपेक्षा आहे.

प्रो-लीगमध्ये हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने आतापर्यंत चमकदार कामगिरी केली आहे. भारताने पाचपैकी दोन सामने निर्णायक वेळेत जिंकले आहेत, तर केवळ एकच पराभव त्यांना पत्करावा लागला आहे. विशेष म्हणजे पहिल्या टप्प्यात नेदरलँड्स आणि स्पेनवर मात केली आहे. दुसऱ्या टप्प्याला सुरुवात करताना भारताने सोमवारी स्पेनवर पुन्हा मात केली आहे. त्यामुळे भारतीय खेळाडूंचा आत्मविश्वास निश्चित उंचावला असेल यात शंका नाही.

लीगच्या गुणतालिकेत भारतीय संघ १० गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. आघाडीवर असलेल्या नेदरलँड्सचे १८ गुण असून, पाठोपाठ अर्जेंटिना (१३) आणि ऑस्ट्रेलिया (१२) यांचा क्रमांक लागतो. भारतीय संघ चौथ्या स्थानावर असला तरी जागतिक क्रमवारीत भारतीय संघ तिसऱ्या स्थानी आहे, हे विसरता येणार नाही. अखेरच्या दोन सामन्यांत त्यांनी विजय मिळवला असला तरी त्यासाठी त्यांना कराव्या लागलेल्या संघर्षातून भारतीय खेळाडू धडा घेतील.

- **वेळ : सायं. ७.३० वा.**
- **थेट प्रक्षेपण : स्पोर्ट्स-१८ खेल, जिओ सिनेमा.**

‘पेटीएम संकटा’च्या पार्श्वभूमीवर मंथन...

अर्थमंत्र्यांची ‘फिनटेक’ कंपन्यांच्या प्रमुखांसह येत्या आठवड्यात बैठक

पीटीआय, नवी दिल्ली

तंत्रज्ञानाधारित वित्तीय सेवा (फिनटेक) क्षेत्रातील आघाडीची कंपनी पेटीएम सध्या अडचणीत आली आहे. या पार्श्वभूमीवर या क्षेत्रातील कंपन्यांच्या प्रमुखांची बैठक केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन पुढील आठवड्यात घेणार असून, मुख्यतः या कंपन्यांनी नियमांचे कठोर पालन करण्याची सूचना अर्थमंत्र्यांकडून केली जाण्याची शक्यता आहे.

वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेडची उपकंपनी पेटीएम पेमेंट्स बँकेवर रिझर्व्ह बँकेने कारवाई केली आहे. ‘केवायसी’ नियमांचे पालन न करण्यात हयगय केल्याबद्दल रिझर्व्ह बँकेने पेटीएमवर निर्बंध लादले आहेत. पेटीएम ही देशातील डिजिटल देयक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रदूत म्हणून ओळखली जाणारी कंपनी आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन येत्या आठवड्यात या क्षेत्रातील सर्वच मुख्य कंपन्यांच्या प्रमुखांची बैठक घेणार आहेत. बैठकीत या कंपन्यांच्या समस्यांवर चर्चा होईल, अशी सूत्रांनी माहिती दिली.

या बैठकीला रिझर्व्ह बँकेचे वरिष्ठ अधिकारी, अर्थमंत्रालय, उद्योग व अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (डीआयपीपी) यासह इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील. कंपन्यांना नियमांचे पालन करावे, यावर सीतारामन या बैठकीत भर देण्याची शक्यता आहे. कारण या कंपन्यांकडे असलेला पैसा हा सर्वसामान्य जनतेचा असतो. त्यामुळे या कंपन्यांनी नियामकांच्या सूचनांचे पालन करण्याबाबतही सीतारामन भूमिका मांडतील, असे सूत्रांनी सांगितले.

पेटीएम समभागात वाढती खरेदी

रिझर्व्ह बँकेच्या ३१ जानेवारीच्या कारवाईनंतर सुरू झालेल्या पेटीएम (वन ९७ कम्युनिकेशन्स) समभागांतील घसरण कळा, मागील सलग तीन सत्रात थांबली इतकेच नाही तर उलटफेर होत समभागाने ५ टक्के अशा वरच्या सर्किट मर्यादेपर्यंत वाढ साधली आहे. मंगळवारच्या सत्रात समभागांत ५ टक्के वाढ झाली आणि तो ३७६ रुपयांवर बंद झाला. सलग तीन सत्रात मिळून तो १६ टक्क्यांनी वधारला. सध्याच्या समभागाच्या बाजारभावानुसार कंपनीचे २३,८९७ कोटी रुपयांचे बाजारभांडवल आहे.

निर्देशांकांची उच्चांकी दौड कायम

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: भांडवली बाजारात प्रमुख निर्देशांकांची उच्चांकी दौड कायम असून, मंगळवारच्या सत्रात ‘सेन्सेक्स’ने ३४९ अंशांची कमाई केली आणि सलग सहाव्या सत्रात दोन्ही निर्देशांक सकारात्मक पातळीवर स्थिरावले. बँकिंग आणि ग्राहकोपयोगी वस्तू कंपन्यांच्या समभागांमधील खरेदीने निर्देशांकांतील तेजी कायम आहे.

सेन्सेक्सने सुरुवातीच्या सत्रातील घसरण सावरत अस्थिर सत्रात ३४९.२४ अंशांनी वधारून ७३,०५७.४० पातळीवर बंद झाला. सेन्सेक्समधील आघाडीच्या ३० कंपन्यांपैकी १८ कंपन्यांचे समभाग सकारात्मक पातळीवर स्थिरावले. दुसरीकडे राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीमध्ये ७४.७० अंशांची वाढ झाली आणि तो २२,१९६.९५ या या नवीन विक्रमी पातळीवर बंद झाला. दिवसभरातील सत्रात त्याने २२,२१५.६० सर्वोच्च शिखराला स्पर्श केला.

सलग सहा सत्रात सुरू राहिलेल्या आगेकूचीने निफ्टीने ५८० अंशांची तर सेन्सेक्सने १,९८४ अंशांची कमाई केली आहे.

ऋषभ पंत पुनरागमनाच्या मार्गावर

नवी दिल्ली : अपघातानंतर सावरत असलेला यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतने दिल्ली कॅपिटल्सच्या सराव सामन्यात सहभाग घेऊन ‘आयपीएल’मधून पुनरागमनाच्या मार्गावर असल्याचे संकेत मंगळवारी दिले.

पंत डिसेंबर २०२२ मध्ये भीषण कार अपघातातून वाचला होता. एक वर्ष मैदानापासून दूर राहिल्यानंतर पंत सध्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत पुनर्वसन कार्यक्रमात सहभागी झाला आहे. सामना खेळण्यासाठी तंदुरुस्ती सिद्ध करण्यासाठी त्याचे पूर्ण प्रयत्न सुरू आहेत. त्याचात एक भाग म्हणून आपला ‘आयपीएल’ संघ दिल्ली कॅपिटल्सने कर्नाटकात अलूर येथे आयोजित केलेल्या एका सराव सामन्यात पंतने सहभाग घेतला.

राष्ट्रीय क्रिकेट अकादमीकडूनही या माहितीला दुजोरा देण्यात आला. त्याच्या गतिशिलतेचे मूल्यांकन करण्यासाठीच पंतला या सामन्यात खेळू दिले. नेटमध्ये फलंदाजी केल्यावर तो प्रत्यक्ष सामन्यात कसा खेळू शकतो याचा अभ्यास आम्ही या सराव सामन्यात केला, असे राष्ट्रीय अकादमीतील सूत्रांनी सांगितले.

भारतीय पुरुष, महिला संघ बाद फेरीत

बुसान : भारतीय पुरुष संघाने जागतिक सांघिक टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात न्यूझीलंडवर ३-० अशा फरकाने विजय मिळवत बाद फेरीतील आपले स्थान निश्चित केले. तर, महिलांनी स्पेनवर ३-२ अशी मात करीत आगेकूच केली.

भारतीय संघाला स्पेनकडून चांगले आव्हान मिळाले. श्रीजा अकुला व मनिका बत्रा यांना सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांत पराभूत व्हावे लागले. अयहिका मुखर्जीने विजय मिळवत भारताला सामन्यात पुनरागमन करून दिले. यानंतर श्रीजा व मनिकाने चौथ्या व पाचव्या सामन्यांत विजय नोंदवला. श्रीजाला पहिल्या एकेरीत मारिया जियाओकडून ९-११, ११-९, ११-३, ४-११ असे पराभूत व्हावे लागले. तर, सोफिया-जुआन झांगने मनिकाला १३-११, ६-११, ८-११, ११-९, ११-७ असे नमवले. अयहिकाने यानंतर तिसऱ्या एकेरीत एल्विरा रेडला ११-८, ११-१३, ११-८, ९-११, ११-४ असे नमवत भारताला पुनरागमन करुन दिले. यानंतर मनिकाने चौथ्या एकेरीत मारियाला ११-९, ११-२, ११-४ असे नमवत २-२ अशी बरोबरी साधली. श्रीजाने निर्णायक सामन्यात झांगला ११-६, ११-१३, ११-६, ११-३ असे नमवत भारताला विजय मिळवून दिला.

पुरुषांच्या सामन्यात भारताच्या हरमीत देसाईने चोई टिमोथीला ११-५, ११-१, ११-६ असे पराभूत केले. तर, जी साथियानने ॲल्फ्रेड पेना डेलावर ११-३, ११-७, ११-६ असा विजय मिळवला. यानंतर मानुष शहाने दोन गेमच्या पिछाडीनंतर मॅक्सवेल हेंडरसनला १०-१२, ६-११, ११-४, ११-८, ११-६ असे पराभूत केले.

कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नंदुरबार

जाहीर ई-निविदा सुचना क्रमांक नंदुरबार -०८/२०२३-२०२४

नंदुरबार जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत विशेष दुरूस्ती २०२३-२०२४ च्या ०४ पॅकेजेसची (८ रस्त्यांची कामे, एकुण अंदाजित किंमत ५ वर्षे देखभाल दुरूस्तीसह रू. १०६१.१३ लक्ष) ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामांची बी-१ सविस्तर ई-निविदा **https://www.pmgsytenders.gov.in** या वेबसाईटवर **दि. २३/०२/२०२४** पासुन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ई-निविदा सुचना क्र.	एकुण रस्त्यांची कामे	एकत्रित अंदाजित किंमत ५ वर्षे देखभाल दुरूस्तीसह
०८/२०२३-२०२४	०८ कामे	रू. १०६१.१३ लक्ष

सही/-
(क.वि. देवरे)
कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नंदुरबार

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक प्रदेश नाशिक
कार्यकारी अभियंता कार्यालय, एन. डी. पटेलरोड, शिंगाडा तलाव, नाशिक ४२२००१
दुरध्वनी क्रमांक – २५३-२३०९३२, Email- eemsrtc@gmail.com/deelectnsk@gmail.com

ई निविदा सूचना क्र ०९/२०२३-२०२४ (विद्युत)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नाशिक प्रदेश अंतर्गत विद्युत प्रणालीवर चालणाऱ्या बसेसकरिता विद्युत चार्जिंग स्टेशनकरिता उच्चदाब विद्युत वाहिनी व विद्युत पुरवठ्याचे काम करणे करिता ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा प्रपत्र, प्रपत्र फी, बयाणा रक्कम, अटी व शर्ती याबाबतची माहिती **http://www.mahatenders.gov.in** संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. ई निविदा भरण्यापूर्वी प्रत्यक्ष कामाची पाहणी करण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (विद्युत), रा.प. मुंबई

ADITYA BIRLA CAPITAL संरक्षण गुंतवणूक वित्तपुरवठा सल्ला

आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : इंडियन रेयॉन कम्पाऊण्ड, वेरावल, गुजरात-३६२ २६६
कॉर्पोरेट कार्यालय : आर-टेक पार्क, १०वा मजला, निरलॉन कॉम्प्लेक्स, वेस्टर्न एक्स्प्रेसवे लगत, गोरेगाव (पु), मुंबई-४०००६३.

''परिशिष्ट-IV-ए''
[सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट रुल्स, २००२च्या रुल ८ (६) व रुल ९(१) च्या तरतुदी पाहा]
स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) व रुल ९(१)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२चा ५४) अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून ऋणको, सह-ऋणको व गहाणकारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारींनी घेतला आहे आणि सदर गहाणवट मालमत्तेची विक्री **ऋणको/ सह-ऋणको व गहाणकार म्हणजेच मेसर्स उबाळे कलेक्शन, श्रीमती मनिषा आनंद उबाळे व श्री. आनंद यमाजीराव उबाळे** यांच्याकडील सुरक्षित धनकोंच्या देय वसुलीच्या तारखेपर्यंत रकमेवरील पुढील व्याज व अन्य खर्च आणि १२.०८.२०२३ पर्यंत व्याज व थकीत मुद्दल, थकीत देणी (समाविष्ट निघालेला विलंब आकार) याद्वारा **रु. १,०५,६९,२३४.८० (रुपये एक कोटी पाच लाख एकोणसत्तर हजार दोनशे चौतीस व पैसे ऐंशी फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता २९.०३.२०२४ रोजी **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' व ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे.

राखीव किंमत **रु. १,२०,८८,१७०/- (रुपये एक कोटी वीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार एकशे सत्तर फक्त)** असणार आहे. त्याच्या सविस्तर विभाजनाची प्रत्येक फ्लॅटच्या इरठे रकमेसह खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे :

सुरक्षित मत्तेचा तपशील	राखीव किंमत (रु.त)	इसारा रक्कम ठेव (रु.त)
''सीटीएस नं. ७२७(पी), शीट नं. ३७, जुना मालमत्ता क्र. २९१० व २९११ व नवीन मालमत्ता क्र. नं. १, सुभाष रोड, सदर बाजार, जालना-४३१ २०३.''	१,२०,८८,१७०/-	१२,०८,८१७/-

स्थावर मालमत्तेचे वर्णन

''सीटीएस नं. ७२७(पी), शीट नं. ३७, जुना मालमत्ता क्र. २९१० व २९११ व नवीन मालमत्ता क्र. नं. १, सुभाष रोड, सदर बाजार, जालना-४३१ २०३.''

विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर म्हणजेच **https://mortgagefinance.adityabirlacapital.com/Pages/Individual/Properties-for-Auction-under-SARFAESI-Act.aspx** किंवा **https://sarfaesi.auctiontier.net** यावर तरतूद केलेली लिंक पाहावी.

स्थळ : जालना
दिनांक : २१.०२.२०२४

प्राधिकृत अधिकारी
(आदित्य बिर्ला फायनान्स लिमिटेड)

JM FINANCIAL

जेएम फायनान्शियल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
(पूर्वीची जेएम फायनान्शियल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात असलेली)
कॉर्पोरेट आयडेन्टिफिकेशन नं.: यू६७१९०एमएच२००७पीएलसी१७४२८७
नोंदणीकृत कार्यालय : सातवा मजला, सीनर्जी, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.
प्राधिकृत अधिकारी : श्री. विशाल उचील, **मोबाईल :** ९८१९९८५५११ / ९८७०८९३१८५,
ईमेल : vishal.uchil@jmfl.com **वेबसाइट :** www.jmfinancialarc.com

परिशिष्ट – IV-ए [रुल ८(६) च्या तरतुदी पाहा)]
स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ८(६) च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव सूचना.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून बॉम्बे रेयॉन फॅशन्स लिमिटेड, आता परिसमापकाद्वारे प्रतिनिधीत्व केलेले (यापुढे "ऋणको" म्हणून संदर्भित) आणि हमीदार **(i) श्री. जनार्दन अग्रवाल (ii) श्री. प्रशांत अग्रवाल (iii) श्री. अमन अग्रवाल (iv) श्रीमती विनिता अग्रवाल (v) एसटीआय इंडिया लिमिटेड (vi) स्कॉट्स प्लान्टेशन प्रा. लि. (vii) बेस्ट युनायटेड लाईफस्टाईल्स प्रा. लि. (viii) रेनॉल्ड शर्टिंग लि. (ix) बी. आर. मशिन टूल्स प्रा. लि. (x) कॉर्पस कॉईन रिआल्टी प्रा. लि.** (एकत्रितरित्या "हमीदार" म्हणून संदर्भित) आणि **लातूर इंटिग्रेटेड टेक्स्टाईल पार्क प्रायव्हेट लिमिटेड ("हमीदार")** यांना सूचना देण्यात आली आहे की, **"जेएम फायनान्शियल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड"**कडे **जेएमएफएआरसी-फॅब्रीक्स ऑगस्ट २०१८ II-ट्रस्ट, जेएमएफएआरसी-फॅब्रीक्स सप्टेंबर २०१८ III-ट्रस्ट व जेएमएफएआरसी-फॅब्रीक्स जून २०१९ III-ट्रस्टचे विशस्थ म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली** ("सुरक्षित धनको"), गहाण असलेल्या / ताब्यात असलेल्या खाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक ताबा सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्री ऋणको / हमीदारांकडील सुरक्षित धनकोकरिता देणी, प्रदानाच्या तारखेपर्यंत त्यावरील पुढील व्याज व किंमत आणि **३१ जानेवारी, २०२२ रोजी प्रमाणे रु. २४९,८१,००,९३०.३०/- (रुपये दोनशे एकोणपन्नास कोटी ऐक्याऐंशी लाख नवशे तीस व पैसे तीस फक्त) या रकमेच्या वसूलीकरिता २७ मार्च, २०२४ रोजी स. ११.०० व दु. १२.०० दरम्यान "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे"** व **"जे काही आहे तेथे आहे"** या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

उक्त मालमत्तेची विक्री याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेद्वारा सुरक्षित त्यांच्या थकीत देणींकरिता सर्व सुरक्षित धनकोंच्या थकीत कर्जांकरितासुद्धा करण्यात येणार आहे.

स्थावर मालमत्तेचे सविस्तर वर्णन, पाहाणीची तारीख, राखीव किंमत व इसारा रक्कम ठेव खालीलप्रमाणे आहे :

मालमत्तेचे वर्णन
पुढील पट्टाधारी जमिनीचे सर्व खंड व तुकडे – प्लॉट नं. डी-६८, ॲडिशनल लातूर इंडस्ट्रियल एरिआतील, खंडापूरच्या व्हिलेज मर्यादेत व लातूर म्युनिसिपल काउंसिलच्या बाहेरील मर्यादेत, ता. लातूर, जि. लातूर, समाविष्ट मोजमापाची २,००,००० चौ.मी. किंवा त्यासुमारे आणि पुढीलप्रमाणे सीमित : **उत्तरेला किंवा त्या दिशेने** : एमआयडीसी जमीन, **दक्षिणेला किंवा त्या दिशेने** : एमआयडीसी रोड ३०.०० मी. आर/डब्लु, **पूर्वेला किंवा त्या दिशेने** : एमआयडीसी रोड ३०.०० मी. आर/डब्लु, **पश्चिमेला किंवा त्या दिशेने** : एमआयडीसी जमीन.
राखीव किंमत (रु.'त) :– रु. ५०,४५,००,००० (रुपये पन्नास कोटी पंचेचाळीस लाख फक्त)
इसारा रक्कम ठेव (रु.'त) :– रु. ५,०४,५०,००० (रुपये पाच कोटी चार लाख पन्नास हजार फक्त)
पाहाणीची तारीख व वेळ : ०७ मार्च, २०२४ रोजी, स. ११:०० व दु. ०४:०० दरम्यान

भार : जेएमएफएआरसीला ज्ञात नाहीत.

विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **https://www.jmfinancialarc.com/Home/AssetsForSale** या सुरक्षित धनकोच्या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

तारीख : २१.०२.२०२४
स्थळ : लातूर

स्वाक्षरी/-
प्राधिकृत अधिकारी
जेएम फायनान्शियल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
जेएमएफएआरसी – फॅब्रिक्स ऑगस्ट २०१८ II-ट्रस्ट, जेएमएफएआरसी-फॅब्रिक्स सप्टेंबर २०१८ III-ट्रस्ट व जेएमएफएआरसी – फॅब्रिक्स जून २०१९ III-ट्रस्टचे विश्वस्थ म्हणून तिच्या क्षमतेत कार्यरत असलेली

नमो महारोजगार मेळावा
JOB FAIR
नमो महारोजगार मेळावा
सुवर्णसंधी रोजगाराची, तुमच्या उज्ज्वल भविष्याची!
कार्यक्रम रूपरेषा
दि. 23 फेब्रुवारी 2024
दि. 24 फेब्रुवारी 2024
व्यवसाय, स्व